आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक २८५ वा ● शुक्रवार दि. १८ एप्रिल २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – राज्य सरकार एवढे बेमुवर्तखोर कसे काय झाले हेच कळत नाही. डोकं बधीर झालं आहे.

दुसरा – अरे, तूझं डोकं सरकलं आहे काय ? फडणवीस सरकारला बेमुवर्तखोर म्हणतो आहेस. फडणवीस सरकारचे हात थेट दिल्ली पर्यंत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पर्यत पोंहचलेले आहेत तूझी घेरली आहे का ? गप्प बस ना.

एक – अहो, मला कोणाची भिती वाटत नाही. खरे बोलतोय, माझ्याकडे तसा पूरावा आहे समजलं.

दुसरा – अरे, कशाला बडबड करतो आहेस, कशाबद्दल सरकार बेमुवर्तखोर आहे म्हणतोस ते तरी सांग.

एक – अहो, भिमा कोरेगांव प्रकरणी संभाजी भिडे हा आरोपी असल्याचा पोलीसी अहवाल असतानाही तो मोकळा आहे, कालपरवाच सातार्‍यात त्या भिडेला कूत्र्याने चावा घेतलाय. पण पोलीसाना कसा काय गावत नाही, अक्षय शिंदे प्रकरणी न्यायालयाने संबधीत पोलीसावर गून्हा दाखल करा असे आदेश दिले, सोमनाथ सुर्यवंशी मृत्यूप्रकरणी संबंधीत पोलीसावर न्यायालयाने गून्हे दाखल करा म्हटले पण शासन, फडणवीस सरकार बेमुवर्तपण पोलीस कर्मचार्‍याना अभय देत आहे. त्यांच्यावर गुन्हे दाखल करीत नाही मग तो सर्रास बेमुवर्तपणा नाही काय मग बोला.

दुसरा – अरे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. गृहखाते ही त्यांच्याकडे आहे, परंतू संबंधीत पोलीस, गुन्हेगार कोणत्या पक्षाशी संबंधीत आहेत शिंदे, पवारांचे की भाजपा, कॉग्रेस पक्षाचे आहेत हे सारे तपासूनच तशी कारवाई करतील तू एवढी घाई कशाला करतो आहेस.

एक – अहो, म्हणजे गून्हे दाखल करणेसाठी ही तपास, चौकशी करावी लागतेच हे मला माहीत नव्हते. म्हणजे खूर्चीसाठी हा सालसूदपणा असावा एवढेच ना !

## काय बोलता राव ?

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी केंद्र सरकारने वक्फ बोर्ड कायद्यात सुधारणा करुन वक्फची मालमत्ता ताब्यात घेण्याची खटाटोप केला असला तरी त्या संदर्भात आव्हाण देणाऱ्या याचिकावर सुनावणी चालू असतानाच सर्वोच्च न्यायालयाने वक्फ बोर्डावर मुस्लिम समाजाचेच सदस्य हवेत असा निर्णय दिल्याने बुध्दगया येथील महाबोधी विहाराच्या ट्रस्टमधून इतरांची अर्थात ब्राम्हण सदस्याची हकालपटी आणी बौध्दाना, भिक्कूना संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

**काय बोलता राव !**

अरे, उत्तरप्रदेशातील बुध्दगया येथील पूरातन महबोधी विहार हे ब्राम्हण भटाच्या त्याब्यात होते, ते विहार बौध्दाच्या, बौध्दभिक्कूच्या ताब्यात द्यावे अशी अनेक वर्षापासूनची मागणी होती, भारतभर आंदोलन सुरु होते, महाराष्ट्रात ही सर्वत्र आंदोलन सुरु होते. लातूर येथे ही महाबोधी विहार मूक्तीसाठी आंदोलन छेडण्यात आले होते. सवोच्च न्यायालयाने वक्फ बोर्डावर मुस्लिम सदस्य असलेच पाहीजे असा निर्वाळा दिल्याने बुध्दगया येथील महाबोधी विहार बौध्दाच्या, बौध्दभिक्कूच्या ताब्यात येण्यासाठीचा मार्ग सुकर झाला यात संदेह नाही. मग बोला दाजीबा !




# आशा स्वयंसेविका आरोग्य सेवेच्या खऱ्या आधारस्तंभ डॉ. हनुमंत कराड यांचे मत



लातूर – शहरी व ग्रामीण भागातील लोकांच्या घरापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यात आशा स्वयंसेविकांचे योगदान अतिशय मोलाचे असून त्या खऱ्या अर्थाने समाजाचे आरोग्य रक्षण करणारे आधारस्तंभ आहेत, असे मत एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केले.

येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या वतीने लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील आशा स्वयंसेविकांसाठी एमआयटी येथील संत ज्ञानेश्र्वर घुमट येथे आयोजित अशा स्वयंसेवीका आरोग्य प्रशिक्षण मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. हनुमंत कराड बोलत होते. यावेळी यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. एकनाथ माले, एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, मुख्य लेखा अधिकारी सुनील कवठेकर हे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, धकाधकीच्या जीवनशैलीमुळे लोक तोंडाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे विविध आजार उद्भवतात. अशा दंत आजारावर वेळीच होणे आवश्यक असते. त्याअनुषंगाने जागरूकता निर्माण करण्याचे कार्य आशा कार्यकर्त्या उत्कृष्टपणे करत आहेत. त्यांच्या योगदानामुळे आरोग्य सेवा प्रत्येकाच्या दारात पोहोचत आहे. यावेळी उपस्थित आशा स्वयंसेविकांनी दंत आरोग्य जागृती बद्द्ल विचारलेल्या प्रश्र्नाला होकारार्थी प्रतिसाद देत यापुढील काळात मौखिक आरोग्याविषयीच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आश्र्वासन दिले.

या प्रसंगी डॉ. एकनाथ माले यांनी सामान्य आरोग्य आणि आवश्यक उपचार याविषयी मार्गदर्शन करुन यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील विविध उपचार शाखा व उपलब्ध सुविधांविषयी माहिती दिली. तसेच बाल दंत रोग तज्ज्ञ डॉ. प्राजक्ता गायकवाड यांनी बाल दंत आरोग्य या विषयी, मुख औषध व क्ष – किरण शास्त्र तज्ज्ञ डॉ. अभय कुलकर्णी यांनी मौखिक आरोग्याचे महत्त्व, प्राथमिक तपासणीचे तंत्र आणि आरोग्य जनजागृतीच्या पध्दती याविषयी सखोल मार्गदर्शन करुन एमआयडीएसआर दंत रुग्णालयातील उपलब्ध विविध दंत उपचार पध्दती व सुविधा विषयी माहिती दिली. तसेच फिजीओथेरपी तज्ज्ञ डॉ. सुभाष खत्री यांनी विविध आजार आणि त्यातील फिजीओथेरपीचे महत्त्व सांगून एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालयातील विविध उपचार पध्दती व उपलब्ध फिजीओथेरपी उपकरणांबद्द्ल माहिती दिली.

यावेळी दंत आरोग्य, फिजिओथेरपी उपचार व सामान्य आरोग्याविषयी उपस्थित आशांनी तज्ज्ञांकडून सबंधीत आरोग्य शाखांत येणाऱ्या अडचणी बाबत माहिती करुन घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.डी.एस. अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनी मृणाल कुलकर्णी व मृदुला बिक्कड यांनी केले. तर आभार श्री ज्ञानोबा केंद्रे यांनी मानले या मेळाव्यासाठी लातूर महानगरपालिका हद्दीमधील आशा पर्यवेक्षिका, आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लातूर मध्यवर्ती बसस्थानक येथून बस वाहतूक पूर्ववत सुरु

लातूर (जिमाका): येथील मध्यवर्ती बसस्थानक क्र. १ येथील काँक्रीटीकरणाचे काम २७ जानेवारी २०२५ रोजी सुरू झाले होते. या कामादरम्यान बस फेऱ्यांमध्ये बदल करण्यात आले होते. आता काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाल्याने २३ एप्रिल २०२५ पासून मध्यवर्ती बसस्थानक क्र. १ येथून बस वाहतूक पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे.

२६ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार, ८ एप्रिल २०२५ रोजी पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती बसस्थानकावरील वाहतूक कमी करण्यासाठी बैठक पार पडली. या बैठकीस आयुक्त महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन अधिकारी, राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक आणि पोलीस निरीक्षक, वाहतूक नियंत्रण शाखा, लातूर उपस्थित होते. लातूर शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची वर्दळ लक्षात घेता सोलापूर, धाराशिव आणि बार्शी–पुणे मार्गावरील बस वाहतूक बसस्थानक क्र. २, अंबेजोगाई रोड, लातूर येथून आणि इतर



मार्गावरील वाहतूक पूर्ववत मध्यवर्ती बसस्थानक क्र. १ येथून चालविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२३ एप्रिल २०२५ पासून बस वाहतुकीचे नियोजन खालीलप्रमाणे आहे:

मध्यवर्ती बसस्थानक क्र. १, महात्मा गांधी चौक, लातूर: लातूर–नांदेड, नागपूर, अमरावती, अकोला मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ल्याच्या आणि मध्यम पल्ल्याच्या बसेस. लातूर–आष्टा–उदगीर मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ल्याच्या आणि मध्यम पल्ल्याच्या बसेस. लातूर–जळकोट, मुखेड, बिलोली, निजामाबाद मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ल्याच्या आणि मध्यम पल्ल्याच्या बसेस. पुणे मार्गावरून येऊन नांदेड, उदगीर, मुखेड मार्गावर धावणाऱ्या सर्व बसेस मध्यवर्ती बसस्थानक क्र. १ येथे प्रवासी चढ–उतार करून पुढे धावतील.

लातूर–औसा, लातूर–उमरगा, लातूर–निलंगा आणि पुढे बिदर, हैदराबाद मार्गावरील सर्व बसेस. औसा आणि निलंगा आगाराच्या पूर्ववत सुरु असलेल्या सर्व ग्रामीण आणि रात्रवस्ती बसेस. मध्यवर्ती बसस्थानकावरील ग्रामीण बसस्थानक: यापूर्वी सुटणाऱ्या सर्व साध्या, शटल, ग्रामीण आणि ग्रामीण रात्रवस्ती बसेस. जुने रेल्वे स्टेशन बसस्थानक क्र. ३, लातूर: यापूर्वी सुटणाऱ्या सर्व साध्या, ग्रामीण आणि ग्रामीण रात्रवस्ती बसेस. बसस्थानक क्र. २, जुना रेणापूर नाका, अंबेजोगाई रोड, लातूर: लातूर–अंबेजोगाई–बीड मार्गावरील सर्व बसेस. लातूर–अंबेजोगाई–परळी–परभणी मार्गावरील सर्व बसेस. लातूर–मुरुड–बार्शी–इंदापूर–पुणे–मुंबई मार्गावरील सर्व बसेस. लातूर–तुळजापूर–सोलापूर–पंढरपूर–कोल्हापूर मार्गावरील सर्व बसेस. लातूर–धाराशिव मार्गावरील सर्व शटल आणि पुढे जाणाऱ्या बसेस.

# लातुरात आयएमएचा पदग्रहण सोहळा थाटात संपन्नआयएमएचे अध्यक्ष डॉ. अभय कदम, सचिव डॉ. ऋषिकेश हरिदास तर महिला अध्यक्षपदी डॉ. ज्योती सूळ यांची निवड

लातूर : वैद्यकीय क्षेत्रातील महत्वाचे संघटन असलेल्या




इंडियन मेडिकल असोसिएशनचा लातूर जिल्ह्यातील नूतन पदाधिकाऱ्यांची निवड झाल्यानंतर पदग्रहण सोहळा बुधवार १५ रोजी अत्यंत थाटामाटात संपन्न झाला. माजी मंत्री आ. अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजीराव काळगे, आरोग्य उपसंचालक डॉ. अर्चना भोसले,शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते आदी मान्यवरांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरच्या अध्यक्षपदी डॉ. अभय कदम, सचिव डॉ. ऋषिकेश हरिदास तर महिला अध्यक्ष म्हणून डॉ. ज्योती सूळ, सचिव डॉ. प्रियंका डावळे, कोषाध्यक्ष डॉ. अपूर्वा चेपूरे, यांच्यासह उर्वरित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार, डॉ. वैशाली चपळगावकर, डॉ. ओमप्रकाश भोसले, डॉ. हनुमंत किणीकर, डॉ. आशिष चेपूरे, कोषाध्यक्ष डॉ. चांद पटेल, डॉ. दिपक गुगळे, डॉ. वैशाली दाताळ, डॉ. राखी सारडा, डॉ. रचना जाजू, डॉ. अर्चना कोंबडे, डॉ. शारदा इरपतगिरे डॉ. चंद्रज्योती धनगे आदींची निवड करण्यात आली. यानंतर शहरालगत असलेल्या हॉटेल कार्नीव्हल या ठिकाणी आयोजित शानदार सोहळ्यात सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले माजी मंत्री अमित देशमुख यांनी मार्गदर्शन करताना शैक्षणिक, औद्योगिक आणि व्यापारी केंद्र म्हणून ओळख असलेल्या लातूर येथील सर्व डॉक्टर मंडळी अत्यंत सेवाभावाने रुग्णांची सेवा करीत असल्यामुळे हे शहर आता आरोग्य सेवेचे केंद्र म्हणूनही विकसित होत आहे, लातूरची ही नवीन ओळख अधिक दृढ होण्यासाठी येथील लोकप्रतिनिधी म्हणून आपण सर्वतोपरी सहकार्य आणि प्रयत्न करीत आहोत, डॉक्टर मंडळींना कोणतेही अडचण येणार नाही यासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा येथे उभारण्यात येत आहेत, लातूर आयएमएच्या मागणीवरून रुग्णालयाचा परवाना तीन वर्षाऐवजी तो पाच वर्षापर्यंत वाढवण्याची मागणी आपण सरकारकडे

लावून धरली आहे, मुख्यमंत्र्यांनी ती मागणी तत्वता मान्य केली आहे त्यामुळे लवकरच तसा निर्णय संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागू होईल. डॉक्टरांच्या इतर मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठीही आपण तत्पर असल्याचे यावेळी बोलताना सांगितले. यावर समाधान व्यक्त करत लातूरचे लोकप्रतिनिधी म्हणून नूतन अध्यक्ष डॉ. कदम यांनी बॉम्बे नर्सिंग होम अधिनियम रजिस्ट्रेशन बाबत असलेल्या अडचणी तात्काळ दूर व्हाव्यात तसेच यातील नूतनीकरणाची मुदत ३ वरून ५ पाच वर्षांची करावे, लातुरात आयएमए भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी आदी मागण्या मांडण्यात आल्या, यावर आमदार अमित देशमुख यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, यामुळे सर्वांनी समाधान व्यक्त केले. यावेळी महिला अध्यक्षा डॉ. ज्योती सूळ यांनी महिला वर्गातील आजरांची संख्या पाहता येणाऱ्या काळात आपण महिलांच्या आरोग्यासाठी काम करणार असल्याचे यावेळी सांगितले. या प्रसंगी डॉ. चंद्रकांत शिरोळे, डॉ. आरदवाड, डॉ. सरिता मंत्री, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. अजय जाधव, डॉ रमेश भराटे, डॉ. हंसराज बाहेती, डॉ. तोषणीवाल, डॉ. भाऊराव यादव, डॉ. सुरेखा निलंगेकर, डॉ. दाताळ, डॉ. वसुधा जाजू, डॉ. माधुरी कदम, डॉ. वैशाली दाताळ, डॉ. सलगर यांच्यासह लातूर आयएमएचे जवळपास २५० सदस्य सोहळ्यासाठी उपस्थित होते.

# जल व्यवस्थापन पंधरवडा २०२५ अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध आणि चित्रकला स्पर्धा

लातूर, (जिमाका): जल व्यवस्थापन व कृती आराखडा पंधरवडा २०२५ अंतर्गत जलसंपदा विभागाच्यावतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी (वय किमान १६ वर्षे व त्याहून अधिक) निबंध आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन केले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन लातूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे.

निबंध लेखन आणि चित्रकला स्पर्धे साठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही. निबंध आणि चित्र हे दिलेल्या विषयांनुसारच असावेत. निबंध ३०० शब्दांपेक्षा जास्त नसावा. तसेच लेखन आणि चित्रकलेसाठी लागणारी सामग्री स्वतःची वापरावी; यासाठी कोणताही परतावा मागता येणार नाही. निबंध किंवा चित्र स्वखर्चाने दिलेल्या पत्त्यावर समक्ष किंवा पोस्टाने पाठवावे; यासाठी कोणताही परतावा मागता येणार नाही. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

प्रवेशिका सादर करताना त्यामध्ये स्पर्धेचे नाव, स्पर्धकाचे नाव, शिक्षण, शाळा/महाविद्यालयाचे नाव, वय, संपर्क क्रमांक, पत्ता, दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, ओळखपत्र/आधार कार्डची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. स्पर्धकांनी निबंध अथवा चित्र आणि प्रवेशिकेतील माहिती समक्ष किंवा पोस्टाने कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र. १, सिंचन भवन, पहिला मजला, जुना औसा रोड, प्रिया रेसिडेन्सीजवळ, लातूर–४१३५१२ या पत्त्यावर २७ एप्रिल २०२५ पर्यंत पाठवावी, असे लातूर पाटबंधारे विभाग क्र. २ चे कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.

निबंध स्पर्धेचे विषय:

जलसंवर्धनासाठी नवीन तंत्रज्ञान

जलसमृद्धी हीच जीवन समृद्धी

लातूर जिल्ह्यातील पाण्याच्या समस्या आणि उपाय

जलसंवर्धन आणि वनसंवर्धन

धरणे, जलाशये आणि कालव्यांचे महत्त्व

चित्रकला स्पर्धेचे विषय:

पाण्याची आवश्यकता आणि महत्त्व

पाण्याची बचत आणि भविष्यातील गरजा

पाणी आणि पर्यावरण यांचा सहसंबंध

पावसाच्या पाण्याचे पुनरुज्जन

# महानगरपालिकेच्या वतीने नंदनवन नागरी बेघर निवारा सुरु शहरातील बेघरांसाठी लाभदायक – आयुक्त देविदास जाधव.





लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना– राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरातील बेघर नागरिकांसाठी बेघर निवारा सुरु करण्यात आला आहे. सदर निवाऱ्याची पाहणी महानगरपालिका आयुक्त देविदास जाधव यांनी केली आणि तेथे असलेल्या बेघर लोकांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी हा निवारा शहरातील बेघर लोकांसाठी लाभदायक होणार आहे. या ठिकाणी त्यांचेसाठी सर्व सुविधा देण्यात येणार असल्याचे तसेच या ठिकाणी पुरुष कक्ष, महिला कक्ष व अपंग कक्ष अशी वेगवेगळी राहण्याची सोय केली आहे याची त्यांनी पाहणी केली.

सदर निवारा महानगरपालिका उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार सुरु करण्यात आला आहे. सदर निवारा शहरातील बेघर लोकांसाठी जसे बस स्थानक, रेल्वे स्टेशन , फुटपाथ , सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, कारखाना व कंपनी परिसर , रस्त्याच्या कडेला, पुलाखाली , बांधकाम साईट, मंदिर मस्जिद अशा ठिकाणी आश्रय घेणारे वृद्ध, अपंग, भिकारी, बालके, महिला, आजारी व्यक्ती, निराश्रित व्यक्ती, बेवारस आणि ज्यांना पूर्णतः उघड्यावर आश्रय घ्यावा लागतो अशा लोकांसाठी बेघर निवारा महानगरपालिका शाळा क्रमांक ४ , ठाकरे चौक येथे सुरु करण्यात आलेला आहे.

तरी शहरातील नागरिकांनी आपल्या कार्यालय परिसर, गल्लीमधील परिसरात अशी बेघर नागरिक दिसून आल्यास त्यांना नागरी बेघर निवारा ठाकरे चौक , मनपा शाळा क्र. ४ झोन कार्यालयाशेजारी विवेकानंद हॉस्पिटलच्या पाठीमागे किंवा ९०२८५९१७४५, ९९२३४५३६५७, ९८५०२०३२११ या मोबाईल नंबर वर संपर्क करावे जेणेकरून अशा बेघर नागरिकांना सुरक्षितपणे नागरी बेघर निवारा येथे आश्रय घेता येईल. असे आवाहन आयुक्त देविदास जाधव यांनी केले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# सोशल मीडियावरही आयपीएलचा फिव्हर !

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगचे हे अठरावं वर्ष आहे. सलग अठरा वर्ष आपली लोकप्रियता टिकवून ठेवणारी आयपीएल ही जगातील एकमेव क्रिकेट लीग आहे. गेली अठरा वर्ष केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट लीग म्हणून आयपीएलकडे पाहिले जाते. जगभरातील अनेक दिग्गज खेळाडू या लीगमध्ये सहभागी होतात. मुळातच क्रिकेटला एका धर्माप्रमाणे स्थान असलेल्या भारतामध्ये आयपीएल सुरू असल्याने सहभागी संघाचे फॅन फॉलोअर्सची संख्या देखील खूप मोठी आहे. आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी फॅन मैदानावर गर्दी करताना दिसतात.

आयपीएलचा सामना कोणत्याही मैदानावर, कोणत्याही शहरांमध्ये असो क्रिकेट रसिकांच्या उदंड प्रतिसादामुळे मैदाने तुडुंब भरली असल्याचे चित्र आपण दरवर्षीच पाहतो मात्र यावर्षी मैदानासोबतच मैदानाबाहेरही आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करण्यासाठी चाहत्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. आजचे युग सोशल मीडियाचे युग आहे. सोशल मीडियाचा वापर न करणारा क्रिकेट चाहता शोधूनही सापडणार नाही. आयपीएलमध्ये सहभागी असणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे दहाच्या दहा संघाचे स्वतंत्र ट्विटर ( एक्स ) अकाउंटस आहेत. प्रत्येक संघाला ट्विटरवर ( एक्स ) फॉलो करणारे लाखो फॉलोअर्स आहेत. हे फॉलोअर्स ट्विटर वरून आपल्या आवडत्या संघाला सपोर्ट करत असतात. आयपीएलची मॅच चालू असताना ट्विट्स चा अक्षरशः पाऊस पडतो. सेकंदाला हजारो ट्विट्स येत असतात. जो तो आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी ट्विट करत असतात.

या सर्वांमध्ये मुंबई इंडियन्स आणि रॉयल बंगळुरू चॅलेंज या संघांचे फॅन फॉलोअर्स सर्वात जास्त आहेत. ट्विटर प्रमाणेच व्हाट्सएप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर देखील चाहते आपल्या संघाला सपोर्ट करीत असतात. आपल्या आवडत्या संघाची मॅच असेल तर चाहते आपल्या संघाला सपोर्ट करण्यासाठी व्हाट्सएपवर स्टेटस ठेवतात. सध्या सोशल मीडियाचं चित्र पाहिलं तर मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग व रॉयल चेलेंजर्स बंगळुरू या तीन संघांना सोशल मीडियावर चाहत्यांचा सर्वात जास्त सपोर्ट मिळताना दिसत आहे. खेळाडूंमध्ये सर्वात जास्त सपोर्ट रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विराट कोहली याला मिळत आहे. टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला तरी विराट कोहलीची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे हे सोशल मीडियावरुन लक्षात येते. दूरचित्रवाणीवर तर प्रेक्षक सामने पाहतच असतात पण ज्यांना दूरचित्रवाणीवर सामना पाहणे शक्य होत नाही ते मोबाईलवर सामना पाहतात.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा सामना कोणत्याही संघासोबत असला तरी प्रेक्षक त्यांचा सामना आवर्जून पाहतात. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सामना जिओ टीव्ही वर सर्वात जास्त पाहिला जातो. करोडो प्रेक्षक जिओ टीव्हीवर सामने पाहतात. प्रत्येक सामन्याला करोडो प्रेक्षक मिळतात हा एक विश्र्वविक्रमच आहे. फेसबुक, व्हाट्सएपवर मॅच कोण जिंकणार याबद्दल चाहत्यांमध्ये पैजा लागत आहे. मॅच संपल्यानंतर मॅचवर आधारित तसेच प्रतिस्पर्धी खेळाडूंच्या खिल्ली उडवणाऱ्या मजेशीर मिम्स बनवून व्हायरल केल्या जात आहे. हे मिम्स बोलके असतात. यातून करमणूक तर होतेच पण संघाची सद्यस्थिती काय आहे हे देखील समजते. गुजरात टायटन संघाचा मुख्य प्रशिक्षक आशिष नेहरा खेळाडूंना सतत काही ना काही सल्ले देत असतो. ड्रिंक्स ब्रेक मध्ये तर तो कर्णधार आणि खेळाडूंना सल्ला देत असतोच पण सामना चालू असतानाही तो खेळाडूंचे डोके खात असतो. वेडावाकडा चेहरा करून हातवारे करत तो खेळाडूंचे डोके खात असतो त्यामुळे त्याची खिल्ली उडवणारे अनेक मिम्स सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. चेन्नई आणि मुंबई संघ सध्या पराभवाच्या गर्तेत सापडले आहेत.

सलग पाच सामन्यात पराभव झाल्याने चेन्नई संघ नेटिझन्सच्या निशाण्यावर आला असून या संघाची सोशल मीडियावर चांगलीच खेचली जात आहे. तीच गत मुंबईची आहे. मुंबईचाही सलग चार सामन्यात पराभव झाला आहे. त्यामुळे या दोन्ही संघांना सोशल मीडियावर टार्गेट केले जात आहे. या दोन्ही संघाचे आधारस्तंभ असलेले धोनी आणि रोहित शर्मा हे देखील आपल्या लौकिकाला साजेशी कामगिरी करत नसल्याने त्यांची देखील सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात खिल्ली उडवली जात आहे. प्रतिस्पर्धी संघाची आणि संघातील खेळाडूंची मजेशीर मिम्स आणि बनवून आणि मेसेज करून खिल्ली उडवतानाच नेटकरी आपल्या आवडत्या संघाला मात्र भरघोस पाठिंबा देत आहेत.

आपल्या आवडत्या संघाला भरघोस पाठिंबा देतानाच प्रतिस्पर्धी संघाची खिल्ली उडवून फॅन आयपीएलचा फिव्हर आणखी वाढवत आहे. एकूणच केवळ मैदानावरच नव्हे सोशल मीडियावर देखील आयपीएलचा फिव्हर वाढल्याचे दिसून येत आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# धर्म आणी भाषा म्हणजे ?

## संपादकीय...

धर्म म्हणजे काय ? भाषा म्हणजे काय आणी त्यात जगणारा माणूस कोण आहे तो कोणत्या जातीचा, वर्णाचा रंगाचा वगैरे प्रश्न मुर्खांच्या नंदनवनात वावरण्याजोगे असावेत असे कोणा ज्ञानवंताने म्हटल्यास ते ठीक वाटते पण तेच कोणा पत्रकाराने म्हटले तर त्यास असे बोलणे, सांगणे, लिहीण्याचा अधिकार कोणी दिला अशी बजबज सुरु होते हे लोकशाहीचे लक्षण गृहीत धरले तरी भाषा व धर्माच्या कांहीही संबंध नाही असा निर्वाळा अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपालीकेच्या उर्दू भाषेतील नामफलकावरुन सर्वोच्च न्यायालयाला द्यावा लागला. ही चपराक भारतातील धर्मपंडीत आणी भाषा तज्ञाना असावी म्हणूनच धर्म व भाषा म्हणजे काय या संदर्भात कुजबूज होताना दिसते आहे.

धर्म म्हणून विचार केला तर हिंदूची, बौध्दाची, जैन, पारशी, ख्रिश्चन, मुसलमान, शिख वगैरेची भाषा कोणती, त्याचा धर्म कोणता हा विषय बाजूला पडतो. इंग्रजी, हिंदी, मराठी या भाषा सर्वत्र वापरात आहेत, त्यात जात आणी धर्म येत नाही, धर्माची पेरणी ही जगभरात, प्रांता, प्रांतात झालेली आहे. जात आणी भाषा जशी सर्वत्र आहे तसेच धर्मवाद ही सर्वत्र जाणवतात, पण अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपालीकेत उर्दू भाषेत फलक लावल्याने एका नागरीकाने ते गाव, शहर उर्दू म्हणजे मुस्लिम असे गृहीत धरुन न्यायालयात धाव घेतली, शेवटी ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणी भाषा व धर्माचा अर्थाअर्थी कांहीही संबंध नसतो. भाषा व धर्म हे अलगआणी तो एक व्यक्ती, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग असतो असा निर्वाळा देवून न्यायसंस्था मोकळी झाली आणी समाजकारणी, राजकारणी, सत्ताकारणी लोकानी भाषा व धर्मावर गहजब सुरु करुन स्वतःची वैचारीक कूवत जनतेच्या वेशीवर टांगली असल्यास त्यात नवल कसले अशीच प्रतिक्रिया समाजमाध्यमातून व्यक्त होताना दिसते आहे.

जात आणी धर्मावर समाजकारण, राजकारण, सत्ताकारण करता येत नाही पण तसे होताना दिसते आहे. कारण सत्ताकारणात अज्ञानवंताचीच मांदीयाळी अधीक असल्याने तसे होते आहे. एकट्या महाराष्ट्रात विविध भाषा,धर्माचे लोक आहेत, इंग्रजी, हिंदीसह मराठी भाषीक जास्तीचे आहेत, तेलगु, मल्यालम, उर्दु, हिंदी, गुजराती भाषीकही आहेत. महाराष्ट्रातील सत्ताधारी लोक हिंदूत्वाचा नारा ठोकतात त्यात अजित पवार हे धर्म निरपेक्षतेचा दावा करतात, महाराष्ट्र हा मराठी भाषीकांचा म्हणजे मराठा,महारांचा आहे,असेल गृहीत धरले तर इतराचे काय असा पेच पडतो. तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यापेक्षा आणी जे कोणी भाषा पंडित आहेत, त्यापेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विविध भाषा, धर्माचे प्रकांडपंडित होते मग त्यांचा धर्म आणी जात कोणती हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो त्यामूळे भाषा व धर्माला एकत्र जोडून राजकारण, सत्ताकारण करता येत नाही असे सर्वोच्च न्यायालयाला खडसावे लागले यांचे आत्मचिंतन करणे गरजेचे वाटते यातच आली राखली जाईल अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

जो धर्म माणसात माणूसकी, आपूलकी, समानता, बंधूभाव, स्वातंत्र्य, एकात्मतेची आणी सामाजीक न्यायाची शिकवण देतो तोच खरा धर्म असतो, हिंदू, हिंदूत्ववाद एक थोतांड आहे असेच, यातून सिध्द होते म्हणूनच धर्म निरपेक्षता व सामाजीक न्यायावर, लोकशाहीप्रधान भारत टीकून आहे त्यास संविधान साक्षी आहे, म्हणूनच धर्म व भाषा म्हणजे काय हे आत्मसात करणे गरजेचे वाटते.

# आपले जिगरबाज सैनिकच खरे हिरो आहेत

ही घटना साधारण २१ वर्षांपुर्वीची आहे. जवळपास एक वर्ष उलटले होते. हिमाचल प्रदेश राज्यातील एका खेड्यातून एक पत्र संरक्षण मंत्रालयाकडे आले.पत्र लिहिणाऱ्याने स्वत: चा परिचय शाळेतील एक शिक्षक म्हणून करून दिला.....पत्रात ते लिहीतात,त्यांच्या एकमेव पुत्राला कारगिल युद्धामध्ये वीर मरण आले होते,आणि त्याचा पहिला स्मृतिदिन काही दिवसातच,म्हणजेच ०७/०७/२००० रोजी येत आहे आणि जर शक्य असेल तर त्याच्या या प्रथम स्मृती दिना निमित्त,त्याला जेथे वीरमरण आले ती जागा त्यांना व त्याच्या पत्नीला बघायची इच्छा आहे.जर राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव हे शक्य होणार नसेल तर ते आपली विनंती मागे घेण्यास तयार आहेत,असाही उल्लेख त्यांनी पत्रात केला होता.

हे पत्र वाचणाऱ्या संरक्षण मंत्रालयातील विभाग अधिकाऱ्याने विचार केला की मंत्रालयाकडून तर अशा भेटीच्या खर्चाची परवानगी मिळणार नाही, परंतु या वीरमाता- वीरपित्याच्या भावना व त्याग बघता त्यांच्या या प्रवासाचा व भेटीचा खर्च या अधिकाऱ्याने स्वतः च्या पगारातून करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार आदेश जारी केला.या शूरवीराच्या हुतात्मा दिनाच्या दिवशी या वयोवृद्ध वीरमाता- वीरपित्याला त्यांच्या एकुलता एक पुत्राला जेथे वीरमरण आले त्या जागेवर सन्मानाने आणण्यात आले. तेथे हजर असलेल्या सर्व सैनिकांनी सावधान होऊन त्यांच्या सन्मानार्थ कडक सलामी दिली.तिथे फक्त एकच सैनिक असा होता ज्याच्या हातात खुप फुलं होती.त्याने शिक्षकांच्या पायांवर डोके ठेवले आणि फुलं वाहिली.त्याने आपले डोळे पुसले आणि नंतर तो इतरां सारखाच सावधान उभा राहून त्यानेही कडक सॅल्यूट ठोकला.



शिक्षकाला आश्र्चर्याचा धक्का बसला आणि ते म्हणाले...तुम्ही एक सन्माननीय अधिकारी आहात...तुम्ही माझ्या पायांना का स्पर्श केला व पाद्यपूजा का केली ..? तुम्हीही इतरांप्रमाणे सलामी देऊ शकला असतात आणि मी त्या सॅल्युट ला प्रतिसाद दिला असता..!

नाही सर. येथे मी इतरांपेक्षा थोडा वेगळा आहे, म्हणजे येथे प्रत्येकजण ड्यूटीवर सज्ज आहे आणि मागील एक वर्ष किंवा त्याहूनही कमी काळात येथे नियुक्त झालेले आहेत.मी तुमच्या शूरवीर मुलाबरोबर त्याच रेजिमेंटमधील त्याच डोंगराळ भागातील कड्यावर पाकिस्तानी शत्रूसमवेत लढा दिला होता आणि स्वतः प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी तुमच्या मुलाचा वीरतापूर्ण पराक्रम बघितला होता.आणि फक्त हेच नाही...

व तो काही क्षण बोलायचं थांबला.....

शिक्षकांनी त्या सैनिकाचा हात धरला आणि म्हणाले, मला सांगा... जे काही मनात असेल ते कुठलाही किंतु न बाळगता मला सांगा... मी रडणार नाही.मला माहित आहे तुम्ही रडणार नाही सर... पण मी ही रडायला नको ना.... तो सैनिक पुढे म्हणाला....त्या तिथेच पाकिस्तानी सैनिक त्यांच्या हेवी मशीन गन ने मिनिटाला शेकडो गोळ्या झाडत होते.आम्ही पाच जण सावधपणे साधारण तीस फुटांच्या अंतरापर्यंत पुढे सरकलो आणि त्या मोठ्या दगडाच्या आडोशाला कानोसा घेत कसेबसे उभे राहिलो. पाकिस्तानी सैनिकांची आमच्यावर नजर होती.त्यांना बहुधा आमचे हाता- पायांचा किंवा पाठीवरील सामानाचा थोडाफार भाग दिसत असेल व ते आमच्यावर गोळ्यांचा वर्षाव करण्यास तत्पर होते. अजून ब्रिगेड च्या इतर सैनिकांची कुमक येण्यात विलंब होत होता. काय करावे ते आम्हाला सुचत नव्हते..!! मग .... ...त्या सैनिकाने एक सुस्कारा सोडला.

पुढे काय झालं..? शिक्षकाने विचारणा केली...

सैनिक पुढे म्हणाला, मी म्हणालो, त्यांचा गोळीबार चालूच राहिल... वेळ वाया घालवण्यात काही अर्थ नाही... मी हे उरलेले तीस फुट अंतर जिवावर उदार होऊन जातो,म्हणजेच मी शत्रूला सामोरे जात त्याच्या गोळ्या अंगावर झेलत त्यांच्या खंदक (बंकर) कडे पळत जातो आणि हातबॉम्ब (ग्रेनेड) टाकून तो उध्वस्त करतो. बंकर नष्ट झाल्यावर तुम्ही सर्व त्याचा ताबा घ्या.

मी हातात हातबॉम्ब (ग्रेनेड) घेऊन शत्रू च्या खंदकाकडे पळण्यास सज्ज होताच तुमच्या मुलाने माझ्याकडे पाहीले व म्हणाला 'तू वेडा आहेस का..? तुझी बायको आणि मुलं तुझ्यावर अवलंबून आहेत.... आणि मी अद्याप अविवाहित आहे. मी शत्रूला सामोरे जातो आणि तू मला संरक्षण (कव्हरिंग) दे,' आणि उत्तराची वाट न पाहता,जबरदस्तीने माझ्या हातातून ग्रेनेड हिसकावून तो शत्रूच्या बंकर च्या दिशेने पळत सुटला.

पाकिस्तानी हेवी मशीन गन (क्च.ऋ) च्या संततधार पावसासारख्या गोळ्या बरसल्या. आपल्या मुलाने तो गोळीबार चुकवत पाकिस्तानी बंकर गाठला आणि ग्रेनेडची पिन काढून तो थेट बंकरमध्ये टाकला व तेरा पाकिस्तानी सैनिकांना यमसदनास पाठवले. हेवी मशीन गन मधून गोळ्यांचा वर्षाव बंद झाला आणि ते क्षेत्र आमच्या नियंत्रणाखाली आले.

सर्वप्रथम तुमच्या मुलाचे शरीर उचलून बाहेर आणणारी मी पहिली व्यक्ती आहे.सर, त्याच्या शरीरात बेचाळीस गोळ्या घुसल्या होत्या.सर,मी त्यांचे डोके हातात धरले त्यानंतरच त्याने शेवटचा श्र्वास घेतला.

मी आपल्या वरिष्ठांना तुमच्या गावी त्याचे पार्थिव पोहोचवण्याची जबाबदारी देण्याची विनंती केली,परंतु सर.,मला नकार देण्यात येऊन दुसऱ्या एका महत्त्वपूर्ण कामगीरीवर मला पाठविण्यात आले.

कदाचित मला या शूरवीराला त्याच्या अंतीम यात्रेत खांदा देण्याचा बहुमान मिळाला असता व मी ही फुले त्याच्या पायावर वाहीली असती. ते मी करू शकलो नाही. पण मला ही फूलं तुमच्या पायावर वाहण्याची संधी तरी मिळाली सर. आणि त्या सैनिकाने एक उसासा टाकला.

शिक्षकाची पत्नी साडीचा पदर तोंडावर लावून मुक अश्रू ढाळीत होती. शिक्षक रडले नाहीत. त्यांनी त्या सैनिकाकडे गांभिर्याने पाहिले आणि सैनिकाने ही अश्रू ढाळले नाहीत आणि त्याने शिक्षकाकडे बघितले.

शिक्षकाने नक्की काय विचार केला हे माहित नाही. आपल्या खांद्यावरील पिशवीतून त्याने एक पुडके बाहेर काढले आणि त्या सैनिकाला दिले व ते म्हणाले, माझा मुलगा सुट्टीवर येणार होता तेव्हा त्याच्यासाठी मी सदरा विकत घेतला होता.पण तो आला नाही.आणि आली,त्याच्या वीर मृत्यूची बातमी...

आता तो सदरा कोण घालेल... जिथे त्याने अखेरचा श्र्वास घेतला तेथे ठेवण्यासाठी मी तो सदरा घेऊन आलो होतो.कदाचित माझ्या मुलाचा आत्मा या ठिकाणी कधीतरी येईल व तो सदरा घालेल अशी माझी श्रद्धा होती,परंतु आता मला माहित आहे की हा सदरा कुणी घालायचा आहे ते.नकार न देता कृपया हा घ्या. त्या सैनिकाच्या डोळ्यातून आता मात्र अश्रूंचे पाट वाहू लागले.तो पुढे सरसावला व त्याने तो सदरा असलेले पुडके स्विकारले.

कारगिल हिरोचे शेवटचे शब्द होते जय हिंद आत्ता हे जाणण्याची वेळ आली आहे ......कारगिल हिरोचे नाव: कॅप्टन विक्रम बत्रा.हिरोच्या वडिलांचे नाव: गिरधारी लाल बत्रा.हिरोच्या आईचे नाव: कमल कांता.

माझ्या प्रिय वाचक मित्रांनो, हे लोक आमचे वास्तविक नायक आहेत.या बलिदानाचा इतिहास आपण कायम स्मरणात ठेवू या.आमिर खानच्या तीन लग्नाच्या बातमी पेक्षा ही बातमी पुढील पिढी पर्यंत पोहोचली पाहिजे,आपले जिगरबाज सैनिकच खरे हिरो आहेत.

Celebrate the Real -ctivists and not Just Celebrities.

लेखक- अनामिक.

(मुळ इंग्रजी भाषेत असलेल्या या लेखाचा मी केलेला स्वैर अनुवाद.)

मेघःशाम सोनवणे (९३२५९२७२२२) नाशिक,सेवा निवृत सैनिक.

# *बाबासाहेब आम्हाला माफ करा*

बाबासाहेब आपण हाल अपेष्ठा भोगून, प्रसंगी उपाशी राहून शिक्षण घेतलं, ते आपणास नोकरी लागावी, उच्च पदावर जावे म्हणून नव्हे; तर आमचा उद्धार करावा म्हणून. आपला लाडका राजरत्न गमावला, रमाई निघून गेल्या तेव्हा आभाळा एवढं दुःख गिळून, सारे विसरून आमच्यासाठी प्राणपणाने लढलात. बाबासाहेब अखेरच्या क्षणीही आपणास यशवंताची चिंता नव्हती तर चिंता होती करोडो अस्पृश्य समाजाची. अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी आपण लढत राहिलात. आम्ही शिकावं, मोठ्या पदावर जावं, स्वाभिमानाने जगावं म्हणून अहोरात्र कष्ट उपसलात. या देशासाठी संविधान आणि संविधानात या देशातील महिला, अस्पृश्यसह सर्वांना सन्मान दिलात. आम्हाला मतदार राजे बनवून गेलात. धर्म नसलेल्यांना धर्म दिलात. आम्ही राजकीय जमात व्हावी म्हणून आरपीआयची आरवणी करून गेलात. आम्हाला शिका, जागृत व्हा, संघटीत व्हा असा जीवनाचा मूलमंत्र देऊन गेलात. आपण नुसतं शिका म्हणाला नाहीत तर शिक्षणासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून गेलात. आम्हाला नुसता धम्म दिला नाही 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा धर्मग्रंथ भारतीय बौद्ध महासभा देऊन गेलात.



त्या बदल्यात आम्ही काय केलं? बाबासाहेब आम्ही तुम्हाला देवत्व दिल. दरवर्षी आम्ही तुमची मोठ्या उत्साहाने जयंती साजरी करतो, मोठ्या संख्येने दीक्षाभूमी, चैत्यभूमीवर जमतो. खरं सांगू बाबासाहेब आम्ही तुमच्या विचाराला सोडून तुमचं सर्व काही स्वीकारलं. तुमच्या जयंतीत कर्कष आवाजात नाचतो, नीट नाचायला यावं म्हणून सर्व काही काळजी घेतो पण नाचताना वाचन आणि शिक्षण कमी झाल आहे. माफ करा बाबासाहेब तुम्ही म्हणालात शिका पण तेवढे जमत नाही.

बाबासाहेब १८ मार्च १९५६ रोजी तुम्ही आग्र्याच्या सभेत म्हणालात, मुझे पढे लिखे लोगो ने धोका दिया असे म्हणताना आपणास किती वेदना झाल्या असतील याची कल्पना शिकलेल्या लोकांना काय कळणार? पण बाबासाहेब आज आपण नाहीत; नाहीतर आपणास त्याहून अधिक वेदना झाल्या असत्या. बाबासाहेब तुमच्या कष्टाच फळ म्हणून आम्ही शिकलो, प्राचार्य, प्राध्यापक, डॉक्टर, इंजिनियर, मोठे साहेब झालो. आमच्याकडे गाडी आली, बंगला आला, बंगल्याच्या आत तुमची प्रतिमा आली, तुम्ही दिलेल्या बुद्ध आणि कधी कधी संघम शरणम ही म्हणतो. पण खरं सांगू बाबासाहेब पद, प्रतिष्ठा, पुरस्कार आणि पैशासाठी संघाच्या दावणीला जाऊन रवंथ करायलाही जाऊ लागलो आहोत. बाबासाहेब तुम्ही जपलेल्या समाजाला धोका ज्याचा आहे त्यांच्यापेक्षा अधिक धोका या शिकलेल्या मतलबी लोकांचा अधिक आहे. संघाच्या सावलीत बसतो आणि मोठ्यांनी जयभीम म्हणत तुमच्या विचारांशी गद्दारी करत आहोत. म्हणून म्हणतो बाबासाहेब आम्हाला माफ करा.

बाबासाहेब धर्मांतराच्या आदल्या दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९५६ रोजी एका पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाला होतात आता राजकीय राखीव जागा बंद करणार एवढेच नव्हे तर शेड्युल कास्ट फेडरेशनच्या सभेतही असा ठराव केला असे म्हणालात आणि या जागा केवळ दहा वर्षासाठी आहेत, असे निक्षून सांगितले होते. याचे कारण राखीव जागेवरून जाणारे अनुसूचित जातीचे पदाधिकारी तोंडाला कुलूप लावून बसतात. त्यांचा मालक बोल म्हणाला तरच बोलतात. असे गधे काय कामाचे असेही बाबा तुम्ही म्हणालात. बाबासाहेब तुमच्या बुद्धिमत्तेला सलाम. तुम्ही जे कल्पिले आहे आज तेच होत आहे. त्यांचं आमदार खासदार पद शोभेसाठी आहे, त्यांच्या सन्मान प्रतिष्ठेसाठी आहे आणि समाजासाठी?

त्यांच्या मालकांनी आदेश दिला तरच काहीतरी पदरात पडते; नाहीतर पक्षांच्या गुलामांना समाजाचं दुःख काय कळणार? असे असले तरी समाजही अशा नेत्यांना शिकलेल्या लोकांना काही बोलण्याची हिंमत करत नाही म्हणून नेत्यांची, समाजातील शिकलेल्या लोकांची हिंमत वाढते. हे पाहिल्यावर समाजाच्या निष्ठाही तकलादू झाल्या आहेत का अशी शंका येते.

बाबासाहेब आपण १४ ऑक्टोबर १९५६ रोजी धर्मांतर केल्यानंतर खूप मौलिक भाषण केलं. खरंतर प्रत्येक धर्मांतरित माणसाने आपल्या मनावर कोरून ठेवावं असं ते भाषण. त्या भाषणात आपण म्हणालात आपण उत्तम रीतीने धर्म पाळण्याचा निर्धार केला पाहिजे नाहीतर महार लोकांनी धर्म निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये. बाबासाहेब आजच चित्र पाहिल्यावर भयावह वाटते. पण त्याचबरोबर आपल्या दूरदृष्टीपणाला शतशः सलाम करावा वाटतो. बाबासाहेब तुमच्या विचारवाटेने चालणारेही आज आहेत; पण बहुतांशी लोकांचं धम्माचं आचरण चिंताजनक आहे. विवाहात आणि मृत्यूप्रसंगी आम्ही बौद्ध आहोत असे वाटते, पण त्यानंतर आम्ही काय असतो, हे आम्हालाच माहीत असते.

बाबासाहेब धम्मपरिषदा हाच आमचा धम्म असे काहीसे चित्र आहे. आपण जागतिक कीर्तीच्या 'महाबोधी' मासिकात लिहिला होतात जन्मतःच कोणी बुद्ध होत नाही, ज्याप्रमाणे ख्रिश्र्चन धर्मात बाप्तीस्मा केला जातो तसा विधी बौद्ध धर्मातही व्हायला हवा पण त्यावर आजवर कोणीही विचार करत नाही. जन्मतःच बौद्ध होतो अशी आमची धारणा आहे. वास्तविक पाहता लहानपणी हा विधी झाला तर बालपणापासून त्यांच्यावर बौद्ध संस्कार होऊ शकतात. हा तुमचा विचार मौलिक आहे; पण आज तरी आम्ही आपल्या विचारापासून कोसो दूर आहोत. कारण धम्म हा विहारात किंवा ग्रंथात नाही तर आचरणात असतो, हे आम्हाला आणखी समजले नाही. यामध्ये बौद्ध भिक्खूंची भूमिका महत्त्वाची आहे.

आज तर संघांनी बौद्ध धम्माला गुमराह करण्यासाठी संघाचे डुप्लिकेट भिक्खू निर्माण केले आहेत. त्यामुळे संभ्रमित वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे आज आम्हाला आपली आठवण होते, पण तुमचे विचार म्हणजे तुम्ही या विचारातून जगले तरच या संभ्रमातून बाहेर येता येईल असे वाटते.

बाबासाहेब दीक्षाभूमी, चैत्यभूमीवर आम्ही प्रचंड संख्येने जमा होतो. तुम्हाला विनम्र अभिवादन करतो; पण त्यानंतर ही एकसंघता कशी हरवत जाते कळत नाही. खरं सांगू बाबासाहेब वाळूच्या ढिगारासारखी आमची अवस्था झाली आहे. कारण नागपूर, मुंबई येथे अनुक्रमे दीक्षाभूमी आणि चैत्यभूमीवर जमा झालेला प्रचंड जमाव निवडणुकीत दिसत नाही. साध्या-साध्या प्रलोभनापायी आम्ही तुम्ही दिलेला मताचा अधिकार विकून मोकळे होतो. त्यामुळे बाबासाहेब तुम्ही दिलेल्या संविधानाला ७५ वर्षे उलटून गेली तरी आपण आखलेला पक्ष नीट उभा राहू शकला नाही. आमचा स्थिर पक्ष नाही, आमदार नाही, खासदार नाही पण एक-दोन मंत्रिपद आम्हाला देऊन समाज गृहीत धरला जातो.

खरं तर अशा परिस्थितीत मार्गदर्शन करण्याची जबाबदारी बुद्धिवादी विचारवंताची आहे. पण हे लोक संघ-भाजपा, सेना यांच्यात अडकली आहेत. बाबासाहेब आज दलित समाजावर सतत अत्याचार होत आहेत, पण त्याविरुद्ध लढण्याची मानसिकता बोथट बनत चालली आहे. उलट या अत्याचाराची सवय होत चालली आहे. एकूण तत्त्वशून्य कातडी बचावाचा खेळ सुरू आहे. अशा अवस्थेत आंबेडकरी नेते, प्राध्यापक, प्राचार्य, डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी या तमाम लोकांनी आज जाहीरपणे किंवा आपल्या अंतःकरणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची माफी मागून आपली राजकीय, शैक्षणिक, सामाजिक चळवळ फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून पुन्हा उभी करण्याची शपथ घेतली तरच या महामानवांच्या जयंती निमित्ताने अभिवादन ठरेल.

**डॉ. सुरेश वाघमार,ज्येष्ठ विचारवंत, लातूर**

**टँकर मुक्त --**

कधी येणारं टँकर
वाट पाहतो फक्त
वाळून गेले पाणी
आटूनचालले रक्त
आश्र्वासने जलमय
गाव हे टँकर मुक्त
नळाला येते पाणी
विश्र्वास ठेवी भक्त
पाणीदार ती वाणी
करे जना आश्र्वस्थ
बोल पडले कोरडे
जलाविना अस्वस्थ
पाण्यासारखापैका
योजनेत केला मुक्त
पाण्यात जाई पैसा
प्रोजेक्ट हो अशक्त
दाद मागावी कुणां
कुणी होईना व्यक्त
नाही संकट सुटका
असो कुणाचे तख्त
विहीर नाले बावडी
ठण ठणाणा रिक्त
पाण्याची मागभीक
मार्गनाही अतिरिक्त

**महादशा --**

हंडाभर पाण्यासाठी
फिरतोयं दाही दिशा
ओरड करावी कशी
कोरड लागली घशा
टँकरवाला माजलेला
ऐकावी उर्मट भाषा
लटपट करतात पाय
वाटे तुम्हां केली
नशा
महागड्यागाड्या त्या
दररोज धुवता कशा
कारंजी नाचे थुईथुई
एसीमध्ये पिके हशा
वॉटरपार्क मस्त चाले
वाजतात ढोल ताशा
पाणी कुठून आणता
प्रश्र्नांकीत तशाचं
रेषा
थेंबभर पाणी द्या हो
इतकीचं रे अभिलाषा
विचारणार मुळीनाही
संपेलं कधी महादशा
महापूर ती अतिवृष्टी
करे त्राहीत्राही भाषा
कशी ही पाणीटंचाई
कशी भागवावी तृषा

**भीम स्मारक --**

बाबासाहेबांचे भव्य
मना मनात स्मारक
बदलून गेले आयुष्य
ते मुर्तीमंत उध्दारक
सद् विचारांचान्यास
बनविले अभ्यासक
पायाअसता भक्कम
जीवन हो विश्र्वासक
मुखकमल तेजाळले
चरित्र हो मनमोहक
संघर्ष कराया सज्ज
परिस्थिती ती दाहक
असे असावे स्मारक
नाही विवाद नाहक
बाबा गुणांचाखजिना
संतृप्त संतुष्ट ग्राहक
हृदयाचीजागा माझी
तेच रे संपूर्ण मालक
लेकरे निळ्यासूर्याची
तेजचं आमचे पालक
स्मारकाची रूंदीउंची
भलती
आश्र्चर्यकारक
भीम विचाराशी जोडे
रे अंतर्मनातले दोरक
उपकार फिटणार ना
अपुरे आपले जीवक
भिमराव पूर्ण विश्र्वाचे
का भांडतो मी नाहक

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

# शेतरस्त्यांचे प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी तालुकास्तरावर आयोजित केली जाणार 'सस्ती अदालत'-विभागीय आयुक्तांचा शेतकऱ्यांशी संवाद

लातूर, (जिमाका): शेतकरी बांधवांसाठी आपल्या शेतात जाण्यायेण्यासाठी शेतरस्ता, पाणंद रस्ता अत्यंत महत्वाचे असतात. अतिक्रमित व बंद झालेले शेत रस्ते, पाणंद रस्ते गाव नकाशाप्रमाणे मोकळे करुन देण्यासाठी तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रम राबविण्याचे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिले. शेतकरी बांधवांनी शेतरस्ते मोकळे देण्यासाठीच्या या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यातील नागरिक आपल्या शेतातील जाण्या-येण्याच्या रस्त्याबाबत अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेद्ने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही. हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी बुधवारी मराठवाड्यातील शेतकऱ्यांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधून शेतरस्ते शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबतच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार, अपर आयुक्त के.आर.परदेशी, उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, उपजिल्हाधिकारी शुभांगी आंधळे यांच्यासह




लातूर येथून निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. गावडे म्हणाले, जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण झाल्याने तक्रारी होतात. सर्वच शिव पाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्र्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. याबाबतची प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यापूर्वीच दिले आहेत. त्यानुसार सर्व तहसीलदार यांनी कार्यवाही करावी, असे विभागीय आयुक्त म्हणाले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांचे निराकरण करण्यासाठी विभागातील सर्व निवासी उप जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी या वेबिनारच्या माध्यमातून चर्चा आणि अडचणीचे निराकरण करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे श्री. गावडे म्हणाले.

लातूर जिल्ह्यातून रामेश्र्वर शेटे, सुदर्शन पाटील, बळीराम पाटील, एकनाथ पांढरे यांनी शेतरस्त्याच्या अडचणी मांडल्या. याबाबत जिल्हा प्रशासनाने मोहिम स्वरुपात कालबद्ध कार्यक्रम राबवावा तसेच तालुका पातळीवर सस्ती अदालत उपक्रमाचे तातडीने नियोजन करावे. असे निर्देश विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी दिले.

शेतरस्ते, पाणंद रस्ते बाबतच्या या संवादात मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यातून शेतकरी चर्चेत सहभागी झाले होते. ज्या शेतकऱ्यांशी संवाद होऊ शकला नाही, त्या शेतकरी बांधवांशी संबंधित जिल्हा, तालुका प्रशासनाने सस्ती अदालतीच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे शेत रस्त्यांचे प्रश्र्न तत्परतेने मार्गी लावावेत, अशा सूचना विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी दिल्या. अपर आयुक्त बाबासाहेब बेलदार यांनी शेतरस्ते व त्याबाबतच्या कायद्याबाबत माहिती दिली.

# निवडणुकीपुरते राजकारण, त्यानंतर समाजकारण, हा मूलमंत्र येथील सर्वच लोकप्रतिनिधी पाळतात !

लातूर : शिक्षण, उद्योग, व्यापार, कृषी, सहकार यासह अनेक क्षेत्रात वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या लातूर जिल्हा क्रीडा क्षेत्रातही पुढे जावा, या क्षेत्रात युवकांनी करिअरच्या संधी शोधाव्यात असे आदरणीय काका दिलीपरावजी देशमुख नेहमी सांगत असतात, आमदार व मंत्री असताना त्यांनी लातूर जिल्हा क्रीडा संकुलावर अनेक सोयी सुविधा उभारल्या, नंतरच्या काळात आम्ही व इतर लोकप्रतिनिधींनीही त्यात भर घातली, लातूरच्या क्रीडा क्षेत्राला पुढे नेण्यासाठी मोठे योगदान दिले आहे, निवडणुकीपुरते राजकारण त्यानंतर समाजकारण हा लातूर जिल्ह्यातील मूलमंत्र येथील सर्वच लोकप्रतिनिधी पाळतात त्यामुळे जिल्हा पुढे पुढे जात आहे, आगामी काळातही लातूर जिल्हा प्रगतीपथावर पुढे जात राहील अशी ग्वाही याप्रसंगी बोलताना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, आमदार अमित विलासराव देशमुख दिली.

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचा भव्य शुभारंभ माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि माजी क्रीडा मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर जिल्हा क्रीडा संकुलात झाला या प्रसंगी ते बोलत होते. रेणा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने आणि लातूर जिल्हा पासिंग व्हॉलीबॉल असोसिएशनच्या पुढाकाराने आयोजित या स्पर्धेत महिला आणि पुरुष गटातील खेळाडू सहभागी झाले आहेत.

यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या ट्रॉफीचे अनावरण करण्यात आले. १६, १७ आणि



१८ एप्रिल रोजी लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुलात ही स्पर्धा रंगणार आहे. स्पर्धेच्या उद्घाटनानंतर महिला गटातील पुणे विरुद्ध यवतमाळ आणि पुरुष गटातील सांगली शहर विरुद्ध मुंबई उपनगर यांच्यात पहिला सामना झाला. अमित विलासराव देशमुख यांनी या सामन्याचा आनंद घेतला.

यावेळी पूढे बोलतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त या स्पर्धा आयोजित केल्या आहेत. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यातील खेळाडू सहभागी झाले आहेत. सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम सुरू ठेवले आहे. भावा-भावातील नाते कसे असावे, हे दिलीपराव देशमुख आणि विलासराव देशमुख यांच्यातील नाते पाहून समजते. व्हॉलीबॉल स्पर्धा या निमित्ताने आयोजित केली असून, त्यातून दिलीपराव देशमुख यांची प्रेरणा घ्यायची आहे. क्रीडा क्षेत्रातील व्यवस्था बळकट करण्याचे काम दिलीपराव देशमुख यांनी केले आहे. क्रीडा मंत्री असताना माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी त्यांचे काम पुढे नेले. या स्पर्धे तील खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या बक्षिसाची रक्कम आयोजकांनी वाढवून विजेत्या खेळाडू आणि संघासोबतच सहभागी खेळाडूंना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यासाठी पुढाकार घ्यावा. लातूर शहरालगत मनपाचे इनडोअर क्रीडांगण उभारण्याचे प्रयत्न करायचे असून, मराठवाड्यात आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल उभारण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावे लागतील. आता पिकल बॉल आणि पॅनल बॉलसारखे खेळ भारतात सुरू होत आहेत. लातूरच्या विकासाचा समतोल राखत हे खेळही सुरू करायचे आहेत. अतिथी देवो भव हे लक्षात ठेवून सहभागी खेळाडूंना कसलीही अडचण येणार नाही याची काळजी घ्यावी.

**दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाचा बोध घेऊन मी क्रीडा मंत्री असताना क्रीडा क्षेत्रासाठी प्रयत्न केले माजी मंत्री आमदार संजय बनसोडे**

माजी मंत्री आमदार संजय बनसोडे म्हणाले, दिलीपराव देशमुख यांना ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा. ते बोले तैसा चाले आहेत. राज्यातील अनेक जिल्हा बँका डबघाईला आल्या असताना दिलीपराव देशमुख यांनी लातूर जिल्हा बँक राज्यात पाचव्या क्रमांकावर आणण्याचे काम केले. क्रीडा मंत्री असताना त्यांनी अनेक बदल घडवून आणले. त्यांच्या मार्गदर्शनाचा बोध घेत मी क्रीडा मंत्री असताना क्रीडा क्षेत्रासाठी प्रयत्न केले. यापुढेही क्रीडा क्षेत्रासाठी प्रयत्न करू.

**जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर (घुगे) म्हणाल्या, कुठल्याही स्पर्धा या जिल्ह्याच्या आणि खेळाडूच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असतात. खेळाडूंनी स्पिरीट महत्त्वाचे ठेवावे.**

स्पर्धेचे अध्यक्ष मोईज भाई शेख म्हणाले, या व्हॉलीबॉल स्पर्धेत राज्यभरातून ८ महिला आणि ८ पुरुष संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत २०० खेळाडू आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचा क्रीडाप्रेमींनी आनंद घ्यावा. क्रीडा प्रबोधिनी लातूरसाठी सुरू होण्याची गरज आहे.

यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, माजी आमदार वैजनाथ दादा शिंदे, माजी आमदार त्रंबक नाना भिसे, मनपा आयुक्त देविदास जाधव, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, व्हाईस चेअरमन अनंतराव देशमुख, कार्यकारी संचालक बी. व्ही. मोरे, सर्व संचालक मंडळ, लातूर जिल्हा पासिंग व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष मोईज शेख, सचिव- दत्ता सोमवंशी, यशवंतराव पाटील, आबासाहेब पाटील, ड. किरण जाधव, जगदीश बावणे, कल्याण पाटील, अभय साळुंखे, ॲड. व्यंकट बेद्रे, ड. दीपक सूळ, ड. समद पटेल, गणपत बाजूलगे, संतोष देशमुख, विजय देशमुख, सचिन पाटील, राजकुमार पाटील, संभाजी सूळ, बाबासाहेब गायकवाड, प्रवीण पाटील, सोनू डगवाले, रमेश सूर्यवंशी, सचिन दाताळ, प्रमोद जाधव, राम स्वामी, प्रवीण कांबळे, ड. फारुक शेख, स्वयंप्रभा पाटील, प्रवीण सूर्यवंशी, अविनाश बट्टेवार, गणेश कांबळे, कैलास पाटील, ज्ञानेश्र्वर बिराजदार, सुभाष घोडके, गणेश एस.आर. देशमुख, सिकंदर पटेल यांच्यासह खेळाडू आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे कार्य सहकार, शिक्षण आणि समाजसेवेची त्रिसुत्री-राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील

इंट्रो - सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख हे सामाजिक आणि राजकीय जीवनातील एक महत्त्वाचे नाव आहे. एका सधन शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या दिलीपरावांनी आपल्या कार्यांनी आणि विचारांनी समाजावर एक अमिट छाप सोडली आहे. त्यांचे जीवन म्हणजे राजकारण, सहकार, शिक्षण आणि समाजसेवा यांचा सुंदर मिलाफ आहे.

सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा अमृत महोत्सवी ७५ वा वाढदिवस १८ एप्रिल रोजी आहे. मांजराकाठावरील बाभळगाव येथे एका सधन आणि प्रतिष्ठित कुटुंबात त्याचा जन्म झाला. त्यांच्या घराण्याला दानशूरतेची आणि ऐतिहासिक परंपरेची पार्श्र्वभूमी आहे. देशमुख कुटुंबाने नेहमीच समाजासाठी काहीतरी करण्याची शिकवण दिली, आणि याच संस्कार व शिकवणीचा प्रभाव त्यांच्या जीवनावर कायम राहिला. लातूर येथील एक विलक्षण व्यक्तिमत्त्व म्हणून आपण सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना ओळखतो. त्यांच्या जीवनयात्रेत राजकारण, सहकार, शिक्षण आणि समाजसेवा यांचा एकसूत्री संगम दिसतो. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या शेतकऱ्याच्या मुलाच्या मनातील समाजसेवेची ज्योत लहानपणापासून पेटलेली होती, ती त्यांनी आयुष्यभर तेवत ठेवली.

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख हे लोकशाहीतील एक आदर्श नेतृत्व आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांत दूरदृष्टी, धोरणीपणा, विचारनिष्ठा, गुणग्राहकता, योजनाचातुर्य, बांधिलकी आणि आत्मविश्र्वास यांसारखे अनेक गुण आहेत. सार्वजनीक जीवनाच्या वाटचालीची सुरुवात गावपातळीवरच्या सरपंचपदापासून झाली. उद्याच्या उपक्रमशील नेतृत्वाची ही सुरुवात होती. ग्रामीण भागातील माणसाच्या दैनंदिन समस्यांना ते नेहमीच आपले मानून पाहत. जिल्हा परिषद अध्यक्षपदावर असताना त्यांनी केलेल्या कामांमुळे लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकासाला दिशा मिळाली. पंचायतराज व्यवस्था सक्षम करण्यासाठी प्रशासनातील सुधारणा, पाणी व्यवस्थापन, ग्रामीण रस्ते बांधकाम, विद्युतीकरण, स्वच्छता, शिक्षण यांसारख्या मूलभूत गोष्टींकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करताना, त्यांनी अनेक नवीन संकल्पना मांडल्या आणि जिल्हा परिषदेला राज्यात प्रथम क्रमांकावर आणले. त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे सामान्य लोकांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली. ग्रामीण भागातील पदाधिकारी यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. आपल्या राजकीय कारकिर्दीत नेहमी सामाजिक बांधिलकी जपली, जनतेच्या समस्या सोडवल्या आणि कार्यकर्त्यांना खंबीर आधार दिला.

महाराष्ट्राचे अर्थराज्यमंत्री आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्री म्हणून त्यांनी महाराष्ट्र विधानमंडळात केलेले कार्य हे त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. अर्थमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या आर्थिक धोरणांवर ठसा उमटवला, तर क्रीडामंत्री म्हणून तरुण पिढीला खेळाच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या कार्यकाळातील अनेक योजना आजही तरुणांना प्रेरणा देत आहेत.

सहकार चळवळीत त्यांनी केलेले कार्य म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील एक क्रांतीच आहे. मांजरा साखर कारखान्यापासून ते लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेपर्यंत, राज्य सहकारी बँक, वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट अशा प्रत्येक संस्थेत त्यांनी आर्थिक पारदर्शकता आणि लोकसहभागाचे तत्त्व रुजवले. शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त करून स्वावलंबी बनवणे हे त्यांच्या सहकारी चळवळीचे मुख्य उद्दिष्ट होते. आज ते साकार होतांना आपण पाहताय. शिक्षणक्षेत्रातील त्यांचे योगदान हेही त्यांच्या समाजकारणाचाच भाग आहे. मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत सुरू केलेल्या शैक्षणिक संस्था आजही हजारो विद्यार्थ्यांना ज्ञानदान करत आहेत.

लातूर जिल्ह्यातील सहकारी चळवळ, ग्रंथालय चळवळ, वृक्षलावगड मोहीम, साक्षरता अभियान, स्वच्छता अभियान अशा सर्व मोहीमांना एक नवी दिशा दिली. त्यांच्या नेतृत्वात व्यवस्थापकीय आणि प्रशासकीय कौशल्य आहे, यामुळे व्यवस्थापनावर आणि प्रशासनावर त्यांची चांगली पकड आहे. कोणत्याही कामात नियोजन, काटकसर आणि शून्य त्रुटी असावी, असा त्यांचा कटाक्ष असतो. मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रेणा आणि जागृती साखर कारखाने यांच्या विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात प्रभावी पैलू म्हणजे माणुसकी. राजकारणात असूनही त्यांनी कधीही जात-पात, धर्म-पंथ यांच्या पलीकडे जाऊन काम केले. प्रत्येक व्यक्तीला ते आपल्या दृष्टीने पाहत. त्यांच्या सहज जनसंपर्कामुळे सामान्य माणसापासून ते उच्चभ्रू व्यक्तीपर्यंत सर्व त्यांच्याकडे आदराने पाहतात.

अध्यात्म आणि संस्कृतीची जोपासना हेही त्यांच्या जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. संगीत, साहित्य, कला यांकडे त्यांचा कल असून ते निसर्गप्रेमी आहेत. त्यांच्या कुटुंबीयांनी - विशेषत: पत्नी सुवर्णाताई आणि मुलगी गौरवी यांनी - त्यांच्या प्रत्येक समाजहिताच्या प्रयत्नाला पाठिंबा दिला आहे.

सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांनी राजकारणात असूनही समाजातील गरीब, गरजू आणि वंचित लोकांसाठी काम केले. नैसर्गिक आपत्ती किंवा अडचणीच्या काळात ते नेहमी लोकांच्या मदतीसाठी धावून गेले.

मांजरा परीवाराचे येथील मागासलेपण दूर करण्यात मोठे योगदान आहे मराठवाडयातील लातूर जिल्हा हा मागासलेला होता या मागसलेपणाच प्रमुख कारण कोरडवाहू शेती, पारंपरीक पिक पध्दती, सिंचन सुवीधा, स्थानीक पातळीवर रोजगारांचा आणि हमखास उत्पन्न देणाऱ्या पिकांचा अभाव, अभाव हे मागासलेपण दूर करण्यासाठी सहकारचा सजीवनी मंत्र दिला आणि गोड साखरेच्या अमृतातून येथे संपन्नतेचे मळे फुलवले

सहकार महर्षी माजी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे जीवन समर्पित समाजकारणाचा अखंड प्रवास आहे. एका सधन आणि प्रतिष्ठित कुटुंबात जन्म होऊनही त्यांनी आपले जीवन सामान्य माणसांसाठी व्यतीत केले. राजकारण, सहकार, शिक्षण आणि समाजसेवा या क्षेत्रांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या नेतृत्वात दूरदृष्टी, धोरणीपणा आणि समाजसेवेची बांधिलकी यांसारखे गुण आहेत. त्यांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि सामान्य माणसांच्या उन्नतीसाठी अनेक महत्त्वपूर्ण कामे केली. त्यांचे विचार आणि कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त, त्यांच्या योगदानाला उजाळा देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. त्यांना मनपुर्वक शुभेच्छा!

**लेखक : राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**
**रा.करकट्टा ता.जि.लातूर**
**मोबाईल ९८९०५७७१२८**

